तरुण भारत संवाद
गुरुवार, २० जून २०२४

# विवेकानंदच्या विद्यार्थ्यांचे एमएचटी सीईटी परीक्षेत यश

**कोल्हापूर :** एमएचटी सीईटी परीक्षेमध्ये विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये तब्बल ४०० पेक्षा अधिक विद्यार्थी अभियांत्रिकी, औषध निर्माण शास्त्र, कृषी अभ्यासक्रमासाठी पात्र ठरले. पीसीएम ग्रुपमध्ये अथर्व करंबळी ९८.४४, श्रध्दा कुंभार ९८.३३, ओम माने ९८.५, अल्तमाश उस्ताद ९७.५०, आदित्य कालेल ९७.४४ टक्के गुण संपादन केले आहेत. पीसीबी ग्रुपमध्ये आदिती पाटील ९९.३, सानिया लोहार ९८.८०, देवेंद्र गायकवाड ९८.३८, प्रणिल हेबाळे ९७.८०, शौमिका चव्हाण ९६.१४ टक्के गुण संपादन केले आहेत. ७० विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना प्रा. कुरणे, प्रा. गीतांजली साळुंखे डॉ. अश्विनी पाटील आदीचे मार्गदर्शन लाभले.

20/06/2024

20/6/24